डॉ. प्रभाकर देसाई
एम्.ए., पीएच् डी.
संचालक

# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

## राष्ट्रीय सेवा योजना

गणेशखिंड, पुणे – ४११ ००७

कार्यालय क्र. : ०२०–२५६२२६८८/८९
: ०२०–२५६२२६९०/९१
: ०२०–२५६२२६९२
: ०२०–२५६९७३४१

संदर्भ : रासेयो/२०२१/३२० दि. २३/०९/२०२१

प्रति,
मा. प्राचार्य/संचालक,
रासेयो संलग्नित सर्व महाविद्यालये परिसंस्था,
पुणे, अहमदनगर व नाशिक जिल्हा,
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ.

विषय : '२४ सप्टेंबर रासेयो दिन' निमित्त विविध विशेष/नाविन्यपूर्ण उपक्रमांचे आयोजन करणेबाबत

महोदय,

महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या मनात सामाजिक जाणीव निर्माण करणे व त्यांच्यात सर्वांगीण व्यक्तीमत्त्व विकास घडवून आणणे या उद्देशाने स्वावलंबन, चारित्रवर्धन व सामाजिक बांधिलकी या मुल्यांचा समन्वय नवीन शिक्षणपद्धतीने घडवून आणण्यासाठी महात्मा गांधी जन्मशताब्दी वर्षापासून २४ सप्टेंबर १९६९ साली महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी राष्ट्रीय सेवा योजना सुरू करण्यात आली.

त्यानुसार प्रत्येक वर्षी '२४ सप्टेंबर' हा दिवस 'राष्ट्रीय सेवा योजना दिन' म्हणून महाविद्यालयांमध्ये साजरा करण्यात येतो. त्यानुसार आपल्या महाविद्यालयामध्ये रासेयो स्वयंसेवकांमार्फत विविध विशेष/नाविन्यपूर्ण उपक्रमांचे आयोजन ऑनलाईन अथवा आवश्यक तिथे प्रत्यक्ष राबविण्यात यावेत.

२४ सप्टेंबर २०२१ रोजी दरवर्षीपेक्षा वेगळया व नाविन्यपूर्ण पद्धतीने आपल्या स्तरावर कार्यक्रमाचे आयोजन करून हा दिवस साजरा व्हावा, असे वाटते. कोविड–१९ प्रतिबंधात्मक नियम व सूचनांचे पालन करण्याबाबत मार्गदर्शक तत्त्वे शासन व स्थानिक प्रशासनाने निर्गमित केली आहेत. ह्या सर्व सूचनांचे पालन करून महाविद्यालय व परिसंस्थांच्या पातळीवर उपक्रम प्रभावीपणे राबवून या उपक्रमाचा सविस्तर अहवाल व छायाचित्रासह **nss_student_list@pun.unipune.ac.in** या मेल आयडीवर (मेलचा विषय **'NSS Day-2021', College NSS Code No.A,B,C,D** या विषयासह) मेलद्वारे पाठवण्यात यावा. महाविद्यालयाने सदर उपक्रमाचा खर्च रासेयो नियमित कार्यक्रमांमधून करण्यात यावा. कळावे, ही विनंती.

संचालक
राष्ट्रीय सेवा योजना

| उपक्रमाचे नाव | दिनांक | सहभागी विद्यार्थी | आयोजित उपक्रम | स्थळ |
|---|---|---|---|---|
| | | | | |
| | | | | |
| | | | | |